## जाहिरातीचा प्रारूप नमुना

**राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरण, महाराष्ट्र राज्य, पुणे**

**जुनी मध्यवर्ती इमारत, तळ मजला, पुणे ४११००१**

फोन नं. (०२०) २६०५०६४१ Email Id :- sceapune@gmail.com

दिनांक ३१.०३.२०१३ च्या अधिसुचनेद्वारे राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरणाची पुणे येथे स्थापना करण्यात आली असून प्रतिनियुक्तीने पद भरती करण्यासाठी पात्र अधिकारी/कर्मचा-यांकडून अर्ज मागविण्यात येत आहेत.

| अ.क्र. | पदनाम | रिक्त पदे | एकूण रिक्त पदे | अर्जदाराच्या वेतनश्रेणीचा तपशिल (सातव्या वेतन आयोगाप्रमाणे) |
|---|---|---|---|---|
| १ | उच्च श्रेणी लघुलेखक | १ | १ | (एस १५) ४१८००-१३२३०० |
| २ | सहाय्यक प्रशासकीय अधिकारी | १ | १ | (एस १४) ३८६००-१२२८०० |
| ३ | लिपीक टंकलेखक | ६ | ६ | (एस ६) १९९००-६३२०० |

उपरोक्त वेतनश्रेणीमध्ये राज्य शासनाच्या सेवेमध्ये असलेले व प्रतिनियुक्ती करीता पात्र असलेले अधिकारी/कर्मचारी यांनी विहीत नमुन्यात अर्ज सादर करावेत. प्रतिनियुक्ती बाबतच्या अटी व शर्ती शासन निर्णय क्रमांक एसआरव्ही-२०११/प्र.क्र.१३७/कार्यासन १२ दिनांक १७.१२.२०१६ व शासन निर्णय क्रमांक एसआरव्ही-२०१६/प्र.क्र.५१०/कार्या.१२ दिनांक १६.०२.२०१८ त्या श्रृखंलेतील वेळोवेळी जाहिर केलेले शासन निर्णय या नुसार राहतील. अर्जाचा विहीत नमुना Intranet या संकेतस्थळावर व मा.सहकार आयुक्त व निबंधक सहकारी संस्था महाराष्ट्र राज्य, पुणे यांच्या www.sahakarayukta.com व राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरण, महाराष्ट्र राज्य, पुणे यांच्या https://scea.maharashtra.gov.in व या संकेतस्थळावर अपलोड केलेला आहे. तरी इच्छुक कर्मचारी/ अधिकारी यांनी अर्ज प्राधिकरणाच्या उपरोक्त पत्यावर /ईमेल वर सादर करावेत तसेच अर्ज प्राधिकरणाच्या कार्यालयातही उपलब्ध आहेत.

सचिव
राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरण,
महाराष्ट्र राज्य, पुणे

राज्य सहकारी निवडणुक प्राधिकरण, महाराष्ट्र राज्य, पुणे यांच्या कार्यालयात प्रतिनियुक्तीने पदे भरणेसाठीच्या

**अटी व शर्ती** :-

१. प्रतिनियुक्ती प्रथमतः तीन वर्षाकरिता करण्यात येईल व संबधित अधिका-याची इच्छुकता व नियंत्रण विभागाचे आवश्यकतेनुसार दिलेला कालावधी कमाल ५ वर्षापर्यंत वाढविता येईल. विहीत केलेला कालावधी संपताच प्रतिनियुक्ती आपोआप संपुष्टात येईल व सदरचा कालावधी संपल्यानंतर कोणत्याही परिस्थितीत मुदतवाढ अनुज्ञेय राहणार नाही.

२. उच्च श्रेणी लघुलेखक (एस १५) ४१८००-१३२३००, सहाय्यक प्रशासकीय अधिकारी (एस-१४) ३८६००-१२२८००, लिपीक टंकलेखक (एस ६) १९९००-६३२०० या वेतनश्रेणीत कार्यरत असलेले राज्य शासनाच्या कोणत्याही विभागातील अधिकारी/कर्मचारी अर्ज करू शकतील

३. प्रतिनियुक्तीवर पदस्थापनेसाठी पदग्रहण अवधी हा शासनाने या संदर्भात वेळोवेळी केलेल्या नियमानुसार अनुज्ञेय राहील.

४. प्रतिनियुक्तीवर सेवा घेणा-या कार्यालयास काही विशिष्ट कारणास्तव विहित कालावधी संपण्यापूर्वी प्रतिनियुक्तीवर आलेल्या अधिका-यास त्याच्या मूळ प्रशासकीय विभागास/ कार्यालयाकडे परत पाठवणे आवश्यक असल्यास , त्या आस्थापनेवरील सक्षम प्राधिका-याने तसे समर्थनीय कारण स्पष्ट करून त्याला/ परत पाठवण्यासाठी यथास्थिती संबंधित प्रशासकीय विभागास/कार्यालयास तीन महिन्यांची पूर्वसूचना (नोटीस) देणे आवश्यक राहील. तथापि, या संदर्भात विशिष्ट कारणे नमूद करून उदा. अनियमितता, अफरातफर, कर्तव्यच्युती इ.कारणे नमूद करून प्रतिनियुक्तीचा कालावधी तात्काळ संपुष्टात आणता येईल.

५. आदेशात विहीत केलेला प्रतिनियुक्तीचा कालावधी पूर्ण होण्यापूर्वीच अधिकारी/कर्मचारी स्वत:हून मूळ प्रशासकीय विभागात/कार्यालयात परत जाण्यास इच्छूक असल्यास त्याने समर्थनीय कारण स्पष्ट करून त्यासाठी किमान तीन महिन्यांची पूर्वसूचना (नोटीस) यथास्थिती दोन्ही प्रशासकीय विभागास/कार्यालयास देणे आवश्यक राहील. अशा परिस्थतीत त्यांच्या विनंतीवरून प्रतिनियुक्ती संपुष्टात आणण्याचा निर्णय प्रतिनियुक्तीच्या आस्थापनेवरील कार्यालयातील सक्षम प्राधिका-याने घेतल्यास, सदर कर्मचा-यांच्या पूर्ण सेवाकाळात अनुज्ञेय एकूण १० वर्षाच्या प्रतिनियुक्ती कालावधीतून आदेशात विहित केलेला प्रतिनियुक्तीचा कालावधी त्याने उपभोगल्याचे समजण्यात येईल.

६. ज्या अधिकारी/कर्मचा-या विरूध्द भ्रष्टाचार/लाचलुचपत गुन्हयासंदर्भातील प्रकरणे, फौजदारी प्रकरणे/ महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपील) नियम १९७९ अंतर्गत नियम ८ खाली विभागीय चौकशी सुरू आहे अथवा शिक्षेची अंमलबजावणी चालू आहे त्यांनी अर्ज करू नयेत.

७. अर्ज सादर करण्याची मुदत जाहिरात प्रसिध्द झाल्यापासून १५ दिवस राहील.(दिनांक २०.०७.२०२४ अखेर)

८. इच्छुक अधिकारी/कर्मचारी जाहिरातीत नमूद केलेल्या विहीत मुदतीत अर्ज सादर करू शकतील. तसेच त्याबाबतची हार्ड कॉपी प्राधिकरणाकडे समक्ष अथवा पोस्टाद्वारे पाठविण्यात यावी.

याशिवाय सामान्य प्रशासन विभागाकडील शासन निर्णय क्रमांक एसआरव्ही-२०११/प्र.क्र.१३७/कार्यासन १२ दिनांक १७.१२.२०१६ व शासन निर्णय क्रमांक एसआरव्ही-२०१६/प्र.क्र.५१०/कार्या.१२ दिनांक १६.०२.२०१८ व श्रृंखलेतील वेळोवेळी निर्गमीत केलेल्या शासन निर्णयातील अटी व शर्ती लागू राहतील.

प्रतिनियुक्तीने नियुक्तीसाठी अर्जदारांनी करावयाचा अर्जाचा नमुना (प्रपत्र १)

| अ.क्र. | मुददा | तपशील/अभिप्राय |
|---|---|---|
| १ | २ | ३ |
| १ | संपुर्ण नाव | |
| २ | कार्यालयाचे नाव | |
| ३ | पद व वेतनश्रेणी —सातव्या वेतन आयोगाप्रमाणे | |
| ४ | जन्म दिनांक | |
| ५ | शैक्षणिक अर्हता | |
| ६ | भ्रमणध्वनी क्रमांक | |
| ७ | सध्याचे पद व त्यावरील नियुक्तीचा दिनांक | |
| ८ | सेवानिवृत्तीचा दिनांक | |
| ९ | मागील ३ वर्षाचे गोपनीय अहवालाच्या प्रती | |
| १० | मत्ता व दायित्व सादर केलेली आहे का? | |
| ११ | पदोन्नतीच्या विचारक्षेत्रात आहे का ? | |
| १२ | वयाच्या ५०/५५ व्या वर्षी पुर्नविलोकन केले आहे का? (लागू असल्यास) | |
| १३ | मागील वेळी प्रतिनियुक्ती करण्यात आली किंवा कसे याचा तपशिल | |
| १४ | विभागीय चौकशी प्रस्तावित आहे किंवा कसे याचा तपशिल | |
| १५ | प्रतिनियुक्तीकरीता निवड झाल्यास विभाग कार्यमुक्त करेल किंवा कसे ? | |

(अर्जदाराची सही)